सुख जेव्हा हात धुवून मागे लागते,

तेव्हा दुःख चेतावले जाते.

दुःखाला सुखाचे वावडे नसते,

फक्त समान अधिकार असावे लागतात.

दुःख येतेच नेहमी सुखाचा पदर धरून

सुखही येतच असते आपला पदर सोडवून

सुख-दुःखाचा हा झगडा आयुष्याला अर्थ देतो

दुःखात असताना सुखाला दारापाशी आणून ठेवतो.

१०.१.२०१९